कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/काविवि/मनास्प/२०२४-२५/१४८७
दि.१०/१०/२०२४

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी आयोजित यंदाची मराठी 'अ' गट नाटयस्पर्धा डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवडयापासून कला अकादमीच्या दिनानाथ मंगेशकर सभागृहात आयोजित करण्यात येणार आहे. सदर स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणा-या सर्व नोंदणीकृत संस्थानी आपल्या प्रवेशिका दाखल करण्याची शेवटची तारीख २२ ऑक्टोबर २०२४ ही आहे. सदर नाटयस्पर्धेचे नियम व अटी तसेच विहित नमुन्यातील प्रवेशिका आदिलशाह पॅलेस, जुने सचिवालय, पाटो-पणजी येथे कला अकादमीच्या स्वागत कक्षात विनामूल्य उपलब्ध आहेत.

इच्छुक नाटयसंस्थानी आपल्या प्रवेशिकेसोबत प्रवेशशुल्क रु.५००/-(रुपये पाचशे मात्र)व अनामत रक्कम म्हणून रु.५०००/-(रुपये पाच हजार मात्र)अकादमीकडे भरणे आवश्यक आहे. सदर रक्कम कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी रोज सकाळी १० ते दुपारी १.०० व सायं. २.०० ते ४.०० या कालावधीत स्वीकारली जाईल. १८६० च्या कायद्याखाली नोंदणी व नूतनीकरण झालेल्या संस्थानाच या स्पर्धेत सहभागी होता येईल. प्रवेशिका दाखल करतेवेळी प्रत्येक संस्थानी आपल्या संस्थेच्या नोंदणी अथवा नूतनीकरणाची स्वसाक्षांकीत प्रत तसेच प्रवेशिकेसोबत संस्थेच्या बँक खात्याचा तपशील सोबत जोडणे अनिवार्य आहे याची सर्व संस्थानी नोंद घ्यावी.

स्पर्धेतील सादरीकरणाचा अनुक्रम शेवटच्यादिवशी सायं.५.०० वाजता आदिलशाह पॅलेस येथील कला अकादमीच्या कार्यालयात सर्व संस्था प्रतिनिधींच्या समक्ष चिठ्ठया टाकून ठरविण्यात येईल. त्यानंतर प्रवेशिका मागे घेण्यासाठी ५ दिवसांची मुदत असून या निर्धारित मुदतीनंतर प्रवेशिका मागे घेता येणार नाही. तरी या अंतिम मुदतीची नोंद घेऊन सर्व इच्छुक नाटयसंस्थानी आपल्या प्रवेशिका निर्धारित मुदतीत दाखल कराव्यात असे कला अकादमीतर्फे कळविण्यात आले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)